Historicity Research Journal Impact Factor : 1.9152 (UIF)
ISSN : 2393-8900 Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

# शिवकालीन कृषी विषयक धोरण

संगशेट्टी आर एम
संगमेश्वर कॉलेज सोलापूर.



राष्ट्राची किंवा राज्याची आर्थिक परिस्थिती उत्तम असेल तर देशात किंवा राज्यात स्थैर्य निर्माण होते. उत्तम प्रकारे देश चालू शकतो जर आर्थिक परिस्थिती नाजूक असेल तरदेशात अराजकता निर्माण होते हे अलीकडच्या अनेक राष्ट्र वरून कळते. त्यासाठी राज्यकर्ते व नेते उत्तम असले पाहिजे. आपल्या देशात अनेक राष्ट्रीय नेते होऊन गेले ते उत्तम प्रकारे राज्यकारभार केले म्हणून आर्थिक परिस्थिती भक्कम राहिली. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ते साधी गोष्ट नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जगाला माहित आहे परंतु शिवकाळाचा विविध अंगाने अभ्यास होणे गरजेचे आहे. आणि अशा विविधांगी अभ्यास झाला तरच खऱ्या अर्थाने आपण छत्रपती शिवाजी महाराजांना समजू शकतो. महाराजांनी त्या काळात महाराष्ट्र कर्नाटकात स्वतंत्र राज्याची निर्मिती त्यांनी केली छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याचे साम्राज्य उत्तम प्रकारे करीत असत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांनी आर्थिक नियोजन सुद्धा उत्तम प्रकारे केले होते. यासाठी आपल्या आर्थिक विकासासाठी त्याकाळी खूप मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी काबाड कष्ट करणारे इतर वर्गही खूप मेहनत घेत असत. आर्थिक विकासाला चालना देत असत. त्यामुळेच देशाची आर्थिक विकासाला चालना मिळत असे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतीविषयक धोरणाला साम्राज्यविस्तार इतकेच महत्त्व दिल्याचे दिसून येते. त्यांचे हे शेती विषयक धोरण कशा प्रकारचे होते ते जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. सध्याच्या काळातही केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला फार मोठी दिशा देणारी ठरेल.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शिवकालीन कृषी विषयक नीती महाराजांची कशा प्रकारची होती व त्यांची सद्यस्थितीत किती उपयोगी आहे हे जाणून घेणे हे महत्त्वाचे होते. म्हणूनच शिवकालीन कृषी विषयक धोरण त्या काळातली कशी होती त्याची सध्याच्या काळात कसा उपयोग होईल यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे तयार करण्यासाठी पूर्णतः प्राथमिक साधन सामग्री व दुय्यम साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये शिवकालीन पत्र सार संग्रह , शिवचरित्र साहित्य अ .रा .कुलकर्णी ,जगन्नाथ सरकार इंटरनेट वरील उपलब्ध साहित्याचा वापर करण्यात आला आहे .तसेच संपूर्ण लेखाची मांडणी कृषी विषयक धोरण कशी होती याची मांडणी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे महाराष्ट्रातील काही भागापुरतीच मर्यादित असले तरी बराच मोठा प्रदेश होता. या प्रदेशावर जरी त्याकाळीआदिलशाही निजामशाही यांची सत्ता होती. तरीसुद्धा तेथील मराठी संस्कृती नष्ट झालेली नव्हती. याचाच अर्थ त्या काळी मराठी राज्याची स्थापना ही शिवाजी राजाकडून झालेली या देशाची थोर सेवाच होय. परंतु शिवाजी महाराज हे केवळ राज्याची स्थापना करून स्वस्थ बसले नाहीत तर हे मराठी राज्य कसे सुजलाम-सुफलाम होईल. व त्याचा आर्थिक बळकट होऊन हे राज्य कसे टिकून राहील याचाही त्यांनी विचार केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय कर्तुत्वाचा काळ तसा कमी होता. १६५६ साली महाराजांनी जावळी जिंकून घेतले. व तेथूनच त्यांच्या

**स्वराज्य विस्ताराच्या कार्याला सुरुवात झाली. सन** 1656 **ते** 1680 **या काळात त्यांच्यावर अफजलखान, शाहिस्तेखान, मिर्झाराजे जयसिंग ,आग्रा भेट व सुटका इत्यादी प्रसंग अशी जीवावर बेतणारे संकट होऊन गेले. पण त्यांचा कल्पक बुद्धिमत्तेच्या जोरावर सुखरूप बाहेर पडले. नंतरच्या काळात महाराजाने कर्नाटक मोहीम आखून तेथे त्यांनी आपले साम्राज्य विस्तार प्रस्थापित केले. महाराजांनी एक ते सव्वा वर्षात खूप मोठ्या प्रमाणात कर्नाटकात साम्राज्यविस्तार निर्माण केले. महाराजांचे एकूणच पन्नास वर्षे इतके आयुष्य वाट्याला आलेले होते. महाराजांनी केवळ तीस ते पस्तीस वर्षाची राजकीय कारकीर्द असले तरी ते कुशल संघटक व संयोजक ही असल्यामुळे एवढ्या खूप मोठ्या प्रमाणात स्वतंत्र सत्तेची स्थापना महाराष्ट्रात निर्माण केले.**

## २ शिवकालीन कृषी विषयक धोरण

**सतराव्या शतकात आजच्यासारखे नवीन तंत्रज्ञान नव्हते. त्याकाळी अशा खेड्यातील त्यांचे प्रमुख व्यवसाय शेती हाच होता .त्यांच्या विकासावरच छत्रपती शिवाजी महाराजांनी विशेष लक्ष दिले. त्यांनी त्यासाठीच खेडे शेती शेतीशी संबंधित असणारे घटक, तेथील विविध प्रश्न कडे विशेष लक्ष केंद्रित केले त्यांनी आपल्या कारकीर्दीत शेती, व शेतीशी संबंधित घटकाबाबत घेतलेले निर्णय व त्यांनी उत्तम प्रकारे अंमलबजावणी करून शेतीची विकास केले ते पुढील प्रमाणे पाहता येईल.**

### १ जमीन सुधारणा विषयक धोरण

**महाराजांच्या स्वराज्यात खूप मोठ्या प्रमाणात जमिनी होती जमिनीचे खडकाळ मुरमाड डोंगराळ व सुपीक जमीन असे भाग पडतात. महाराजांनी आपल्या साम्राज्य मधील सर्व जमिनीची शेतकऱ्यांना देऊन त्यांच्याकडून उत्तम प्रकारे शेतीची सुधारणा करण्यास सांगितले व तसेच सुधारणा करण्यासाठी सरकारकडून हातभारही लावले त्या शेतकऱ्याकडून काही प्रमाणात शेतसारा घेतले जात असे तसेच शेतीवर अवलंबून असणारे अनेक इतर केदार बलुतेदार वतनदार मिरासदार वर्ग होते. त्यांच्याकडेही सर्वसाधारणपणे गावातील एकूण वीस टक्के पेक्षा जास्त जमिनी असे पडीक जमीन विशिष्ट मदतीने लोकांना कसण्यासाठी दिली जात असे पुढे कालांतराने विशिष्ट रक्कम भरल्यानंतर हे लोक जमिनीचे मालक होत असत**

### २ जमीन मोजणी विषयक धोरण

**छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य मधील जमिनीची पाहणी करून त्या जमिनीचे वर्गीकरण केले. व तसेच महाराजांनी आपल्या कारकीर्दीत तीन वेळा जमिनीची मोजणी केली. प्रथम दादोजी कोंडदेव, दुसऱ्यांदा मोरोपंत पेशवा, व तिसऱ्यांदा अण्णाजी दत्तो, कडून जमिनीची मोजणी करून त्यावर सारा आकारला गेला. महाराजांनी प्रत्येक वेळी त्या मोजणीत सुधारणा करून त्यावर कर आकारणी केले. जमिनीची मोजणी महाराजांनी विशिष्ट प्रकारचे काठीची परिमाण म्हणून वापरले. त्या काठीला शिवशाही काठी असेही म्हणतात. या काठीचा वापर केल्याचे सभासद बखरीमध्ये उल्लेख आहे. अशा पद्धतीने जमिनीची मोजणी करून उत्तम मध्यम वाजट हे प्रकार काढून त्यावर सारा आकारला गेला.महाराजांनी प्रत्येक गावाची हद्द व प्रत्येक शेतकऱ्याकडे असलेले जमिनीचे क्षेत्रफळ हे निश्चित करून घेतले.**

### ३ पीक पद्धती धोरण

**मध्यम प्रकारच्या जमिनीमध्ये वर्षातून एखादा पीक घेतले जात असे. परंतु बागायती जमिनी मध्ये वर्षातून दोन ते तीन पिके घेतली जातात. शिवकाळातील बहुतांश गावे स्वयंपूर्ण असल्याने स्थानिक गरजेनुसार पिकाची लागवड तेथे केली जात असे. स्वराज्यातील विविध प्रदेशात व प्रांतात तांदूळ बाली हरीक या प्रमुख पिकाबरोबरच हरभरा, तूर, मूग तसेच तीळ, वताग यासारखी पिके घेतली जात असत. याशिवाय शेतकऱ्याकडून ज्वारी, बाजरी, गहू ,नाचणी, वरी ,हरिक यासारख्या प्रमुख अन्नधान्य पिका बरोबरच सुनीत, ऊस, केळी, हळद, कापूस, तंबाखू ,कांदा-लसूण,तसेच भाजीपाला या व्यापारी पिकांची ही लागवड केली जात असे. याबाबत वि का राजवाडे यांच्या मराठ्यांची इतिहासाची साधने या खंडात उल्लेख केल्याचे दिसून येते. याशिवाय भुईमूग करडई या गणितांच्या पिकाबरोबरच इतर काही पिकांची लागवड केली**

**जात असेल थोडक्यात वरील सर्व पिके खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामात मिळवून घेतली जात होती. काही शेतकऱ्यांनी ही पिके घेत असताना या पिकाला पावसाच्या पाण्याचा माध्यमातून पाण्याची पुरवठा केली जात असे त्यामुळे उत्तम प्रकारे पीक येत असे.**

## ४ पाणी नियोजन विषयक धोरण

**शिवकाळात खूप मोठ्या प्रमाणात जिरायती जमिनी केल्या जात होत्या. शेतीच्या विकासाकडे पूर्वी फारसे लक्ष दिले जात नव्हते. त्यामुळे वर्षातून एखादेच पीक घेतले जात असत महाराजांनी आपल्या कारकीर्दीत जमिनीची सुधारणा करून चांगल्या जमिनी मध्ये उत्तम प्रकारे पीक यावे यासाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था ही केले. महाराजांनी आपल्या काळात नाशिक जिल्ह्यातील धांडोरे याठिकाणी स्वतंत्र धरण बांधले. त्याचबरोबर सातारा जिल्ह्यातील धामणगाव या ठिकाणी मातीचे धरण बांधले. आणि शेतीला पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली. महाराजांनी शेतीला पाणीपुरवठा विहीरीच्या माध्यमातून करीत होते. त्यास मोठे स्थळ असे म्हणतात.**

**धरणाच्या माध्यमातून जे शेतीला पाणीपुरवठा केला जात असे ते पाटाच्या माध्यमातून दिली त्यास पाटस्थळ असे म्हणतात. शिवापूर येथील धरणाच्या माध्यमातून शेतीला उत्तम प्रकारे पाण्याची व्यवस्था केल्याचे दिसून येते**

## ५ कृषी पतपुरवठा विषयक धोरण

**शिवकाळात शेती करणाऱ्या शेतकरी बऱ्याच वेळा दुष्काळी परिस्थितीमुळे हलाखीचे जीवन जगत असत तसेच शेतकरी यावेळी सावकाराकडून व्याजाने पैसे घेत असत त्यामुळे सावकार जास्त व्याज घेतले जात असत. उदरनिर्वाह उत्तम प्रकारे होत नव्हते. ही बाब शिवाजी महाराजांच्या लक्षात आल्यामुळे त्याने अशा गरजू शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी पतसंस्थेची निर्मिती केली. सावकाराकडून स्वतः महाराजांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केली जात असे दिलेली रक्कम हप्त्याहप्त्याने तेथील शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्ज माफ केली जात असे**

## ६ कर विषयक धोरण

**छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्यातील खूप मोठ्या प्रमाणात असलेल्या जमिनी सुधारणा करण्यासाठी शेतकऱ्यांना कर देत असत . करण्यापूर्वी प्रत्येक शेतकऱ्याकडील शेत जमिनीचे मोजणी केली जात अस तसेच जिरायत व बागायत असे जमीन ठरवली जात असे. महाराजांनी जिरायत जमिनीवर शक्यतो कर लादले जात नसत. बागायती जमिनी मधून जे शेतकरी वर्षातून दोन ते तीन पिके घेतात अशा शेतकऱ्याकडून करून घेतले जात अस त्यांच्या उत्पन्नामधील दोन तृतीयांश इतके त्या शेतकऱ्याकडून कर घेतले जा एखाद्यावेळी दुष्काळ पडल्यास शक्यतो त्या शेतकऱ्याकडून कोणत्याही प्रकारचे कर घेतले जात नसतसारा माफ केली जात अस अशा प्रकारची नोंदी इतिहासात सापडतात शिवकाळात शेतीविषयक करामध्ये खूप सवलत असे. रयत सुखी तर राजा सुखी हे महाराजांचे तंत्र होते**

## ७ शेतीतील मनुष्यबळात बाबतचे धोरण

**शिवकाळ हा त्याकाळात धामधुमीचा कालखंड होता .सतत शत्रूंच्या फौजा धुमाकूळ घालत होत्याशिवकाळात शेती हा अत्यंत कष्टाचा व्यवसाय हो यज्ञता त्यामुळे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज भासत असे परंतु दुष्काळी स्थिती व घरातील करते माणसे स्वराज्याच्या कार्यात सतत गुंतल्यामुळे शेती व्यवसायाला आवश्यक त्या प्रमाणात मनुष्यबळाची उपलब्धता होत नसे अशा वेळी मनुष्य भडास पर्याय म्हणून जनावरांचा शेतीच्या कामासाठी वापर करता यावा व तशी आर्थिक तरतूद शेतकऱ्याकडे व्हावी यासाठी शिवाजीराजांनी गरजू शेतकऱ्यांना बैलजोडी विकत घेण्यासाठी आवश्यक ती आर्थिक मदत देण्याबाबत संबंधितांना पत्रव्यवहार केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत त्यामुळे शेतकरी वर्ग अधिक जोमाने कष्ट करून धडपड करीत असे.**

## ८ शेतकऱ्यांना बी-बियाणे व उपकरणे पुरवण्या विषयाचे धोरण

स्वराज्य मध्ये खूप मोठ्या प्रमाणात जमिनी पडून होते. शेतीचा विकास करण्यासाठी शेतकऱ्यांना महाराजांनी वेगळ्या प्रकारचे साधने. ज्यांच्याकडे जास्त साधने तो शेतकरी आर्थिक दृष्ट्या संपन्न अशी ओळख त्याकाळी होते. याच पार्श्वभूमीवर एखाद्या शेतकऱ्यास अशा प्रकारची उपकरणे खरेदी करणे शेतीची गरज असून सुद्धा आर्थिक दृष्ट्या शक्य होत नव्हते. अशा शेतकऱ्यांना महाराजांनी सरकारी तिजोरीतून कर्जपुरवठा करून दिलेली रक्कम बिनव्याजी असत .याशिवाय शेतकऱ्यांनी चांगल्या दर्जाचे बियाणे पुरवली जात असे दुष्काळी स्थितीत बियाण्याचा वापर शेतकरी आपल्या भुकेची गरज पूर्ण करण्यासाठी ही वापरत असत त्यातून पेरणीच्या वेळी शेतकरी गावच्या सावकाराकडून दामदुपटीने बियाणे घेत असत. यातूनही मार्ग काढण्यासाठी शिवाजीराजांनी शेतकऱ्यांना बी बियाणे विकत घेण्यासाठी कर्ज दिले जात असे. असे उदाहरण साधनेतून मिळते.

## ९ शेतकऱ्यांच्या स्थलांतराला बाबतचे धोरण

काही वेळेला दुष्काळ पडल्यास शेतकऱ्यांची परिस्थिती खूप नाजूक होत असे काही वेळेला शेतकरी आपले गाव सोडून जात असत परंतु गाव सोडून गेलेल्या त्या शेतकऱ्याला परत गावांमध्ये बोलून घेतली जात असे याची जबाबदारी गावातील प्रमुख वतनदारांची असे गावचा वतनदार पाटील हा असे. तो गावचा प्रमुख असे छत्रपती शिवाजी महाराज अशा स्थितीत त्या गावातील पाटील व सरकारी अधिकारी त्यांना त्यासाठी जबाबदार धरत असे शेतकर्यांच्या स्थलांतराची प्रामुख्याने दुष्काळी स्थिती व तेथील सरकारी जुलूम ही महत्त्वाची कारणे असतात अशा स्थितीत महाराजांनी त्या ठिकाणच्या सरकारी अधिकाऱ्याला कारवाही करीत असत शक्यतो गावचा विकास व सरकारचा विकास हा त्या पाठी मागचा हेतू होता.

## ९ शेतमालाला योग्य भाव या विषयक धोरण

छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती विषयक धोरण अतिशय उत्तम होते. शेतकऱ्यांनी काबाडकष्ट केल्यानंतर उत्तम प्रकारे शेती केल्यानंतर आर्थिक उत्पादन वाढत असे. त्यांनी पिकवलेल्या मालाला योग्य भाव यावे यासाठीही महाराज विचार करीत असत. शिवाजी महाराजांनी १६७६ मध्ये प्रभावली मामल्याच्या सुभेदाराला पत्र लिहिले आहे त्यावरून त्यांचे शेतमाल किंमत विषयक धोरण स्पष्ट होते. या पत्रात महाराजांनी म्हणतात की हंगामाच्या काळात धान्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होत असल्याने धान्याचे भाव कमी होतात व त्यातून शेतकऱ्यांचा तोटा होतो पण हे धान्य टंचाईच्या काळात विकले तर चांगली किंमत मिळू शकते.शिवाय आपले धान्य ज्या भागात शेतकरी उत्पादित करतो त्या भागात त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होणार नाही कारण महाराजांच्या मते जिथे फक्त तिथं कमी व्यक्त त्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतमाल हुशारीने विकावा अशीही त्यांना सांगितले होते

## ११ शेती नुकसानी बाबतचे धोरण

शिवकाळात जर एकदाचा किंवा मोहिमेचा प्रसंग शेती हंगामाच्या काळात आला तर बऱ्याच वेळा सैन्याच्या हालचालींमुळे पिकाची पेरणी करणे कठीण जात असे. व तसेच उभ्या पिकातून सैनिक गेल्यामुळे पीक वायाही जात असे. त्याचबरोबर काहीवेळा शत्रू सैनिक कधी ते नष्टही होत असे. शेतकऱ्यांची घरे लुटणे असेही प्रकार त्या काळात होते. त्यावर शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांना शेतकऱ्यांच्या कोणत्याही प्रकारचे नुकसान न करण्याबाबतचे तसेच शत्रु सैन्यात तसे करण्यापासून रोखण्याबाबत सक्त आदेश दिल्याचे पुरावे आढळून येतात त्यामुळे शक्यतो आपले सैनिकही शेतकऱ्यांचे पिकाचे नुकसान करीत नसेल व शेतकर्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावत नसे.

## सारांश

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेती विषयक धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी उत्तम प्रकारचे केल्याचे दिसून येते .महाराजांनी आपले साम्राज्य केवळ वाढवले नाही तर त्या साम्राज्याचा सुजलाम्-सुफलाम कशी होईल रयत कशी सुखी होईल याकडे लक्ष दिले. शिवकालीन शेतीविषयक धोरणाची सद्यस्थिती बद्दल पाहत असताना त्यांच्या जमीनधारणा

विषयक निधीचा विचार करता पडीक जमीन कसणारे गरीब रयत नंतरच्या काळात कसे मालक होत असत. वास्तविकपणे महाराष्ट्रात आज एकूण क्षेत्रफळाच्या नऊ टक्के जमीन विविध कारणासाठी पडीक असून ती जर भूमिहीन गरीब व दुर्बल घटकांना कसण्यास दिली तर नक्कीच शेती उत्पादनात वाढ होऊन राज्याची उत्पादन वाढू शकेल. सध्या देशभर शेतजमिनीवर आकारला जाणारा कर हात जमिनीची पाहणी न करताच आकारणी केली जाते. परिणामी त्याचा सर्वाधिक फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना होतो त्यासाठीच अशी करा कारणे शेतकऱ्यांना होईल शिवकाळातील पिकाचा पहाणे केल्यानंतर अन्नधान्य गळीत धान्य भाजीपाला व व्यापारी पिकांचे प्रमाण आदर्शवत होते .सद्यस्थितीतील देशभरातील पिकांचे आकृतीबंध अन्नधान्य पिकांची ऐवजी व्यापारी पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. परिणामी व्यापारी पिकाद्वारे महत्तम उत्पन्न मिळवण्यासाठी विविध आधुनिक कृषी तंत्राचा वापर केला जात आहे .मानवी आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याचा विचार करता शिवकालीन शेतीमधील पिकाच्या विचार करून जनतेने आपले आरोग्य चांगले ठेवता येईल.

शिवकालीन पाणी व्यवस्थापनाचा विचार करता जिरायती शेतीसाठी पाणीपाणीपुरवठा होण्यासंदर्भात जे काही मोठ्या प्रमाणातील नैसर्गिक अडथळे असतील. ते शासनाने खास व विशेष प्रयत्न द्वारे दूर करून जास्तीत जास्त जिरायती शेती पाण्याखाली आणावी. महाराष्ट्रात असा प्रयोग सरकारच्या काळात पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात झाल्याचे दिसून येते. संपूर्ण महाराष्ट्रात असे काम करण्यास मोठा वाव असून त्यादृष्टीने योजना अपेक्षित आहेत छत्रपतीशिवाजीमहाराज शेतकऱ्यांना सावकाराकडून होणारा कर्जपुरवठा व त्यातून त्यांची होणारी पिळवणूक थांबवण्यासाठि स्वतः जातीने लक्ष घालतयासाठी ते शेतकऱ्यांना आर्थिक अनुदान देणे मोफत बियाणे वाटप बिनव्याजी कर्ज देणे यासारखे पर्याय वापरत. या बाबींचा विचार करता सद्यस्थितीतील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची एकूणच स्थिती पाहता त्यांना वरील सर्व किंवा काही उपायांची अंमलबजावणी करून राज्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या शेती व शेतकऱ्यांना आर्थिक संकट तसेच त्यांच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या आत्महत्या यासारख्या समस्येतून वाचवता येईल असे वाटते

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची विस्तार करीत असताना कल्याणकारी धोरण समोर ठेवून राज्यकारभार करीत होते. राजा आपले राज्य जेव्हा कल्याणकारी विचारसरणीच्या आधारे चालवीत असतो. तेव्हा अर्थातच राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी शेती क्षेत्राचा विकासच महत्त्वपूर्ण ठरत असतो याच तत्त्वाची महाराजांनी उत्तम धोरण राबवून आपल्या कृषी क्षेत्रासाठी विचार केलेले दिसून येतो. शिवाजीराजांनी जिरायती शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी उत्तम प्रकारे पाण्याचे व्यवस्थापन केले आणि अधिक प्रमाणात उत्पन्न येण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले .तसेच शेतकऱ्यांना आर्थिक मदत ही केलेले बी बियाणे खत अवजारे व तसेच रक्कम ही दिले. शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा यासाठी ही महाराजांनी योजना केले. अशाप्रकारे विविध सुधारणा महाराजांनी करून कृषी व्यवस्थेत आर्थिक खूप मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले.

## संदर्भ ग्रंथ


१ जदुनाथ सरकार, शिवाजी अंड हीस टाइम्स 1993

२ आवळसकर. शा. वि. शिवचरित्र साहित्य, खंड 9 पुणे 1944

३ जोशी, श .ना. शिवचरित्र साहित्य खंड 9

४ कुलकर्णी, अ, रा, आज्ञापत्र रामचंद्रपंत अमात्य, पुणे. 2007

५ कांबळे आर .एच मराठा कालखंडातील दुष्काळ आणि त्यावरील उपाय योजना. धुळे. 2005

६ सावंत बी. एस मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक आणि आर्थिक इतिहास, नागपूर.

७ राजवाडे वि. का मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड 15

८ वाकसकर वि. स श्री छत्रपतींची एक्याण्णव कलमी बखर, मुंबई 1930

९ डॉ देशपांडे प्र, न मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड 3 धुळे 2002

साने का ना छत्रपती शिवाजी महाराज पुणे 1924